**वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जिल्हा परिषद संबंधीच्या बातम्यांवरील खुलाशा प्रकरणी करावयाची कार्यवाही**

**जिल्हा परिषद सातारा**

**सामान्य प्रशासन विभाग**

परिपत्रक क्रमांक- जा.क्र.नियो-२/कावि/४४५२०१९

दिनांक- ~~सप्टेंबर~~,२०१९

०३ ऑक्टोबर,

**प्रस्तावना**

विविध वृत्तपत्रात शासनाच्या विविध योजना/धोरणे/कार्यक्रम, प्रशासनाची कार्यपध्दती, यंत्रणा, अधिकारी/कर्मचारी यांच्या विषयी इ. बाबतच्या बातम्या प्रसिध्द होतात. त्यामध्ये टिकात्मक विश्लेषण केलेले असते. अशा प्रकरणी शासनाची वस्तुनिष्ठ भूमिका जनतेपुढे येणे अत्यावश्यक असते. त्यादृष्टिने वृत्तपत्रात आलेल्या बातमीवरील शासनाचा खुलासा त्याच दिवशी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठविणे आवश्यक ठरते. तथापि असे निदर्शनास आले आहे की, वृत्तपत्रातील बातमींच्या अनुषंगाने प्रसिध्द करावयाचा खुलासा बातमी प्रसिध्द झाल्याच्या दिवशी पाठविण्यात येत नाही किंवा खुलासा विलंबाने पाठविण्यात आल्याने त्याचे महत्व उरत नाही. यास्तव यासंदर्भात महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक-मुसका-२०१६/१९२५१२/का.१, दिनांक २२ मार्च,२०१६ अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या शासना संबंधीच्य बातम्यांवरील खुलाशा प्रकरणी करावयाची कार्यवाही बाबत परिपत्रक निर्गमित केले आहे. त्याच धर्तीवर जिल्हा परिषद संबंधीच्या बातम्यांवरील खुलाशा प्रकरणी करावयाची कार्यवाही पुढील प्रमाणे निश्चित करणेत येत आहे.

**परिपत्रक-**

वृत्तपत्रात जिल्हा परिषदेच्या योजना/धोरण/कार्यक्रम इ. बाबींसंदर्भात बातमी/टिकात्मक विश्लेषण प्रसिध्द झाल्यास त्याप्रकरणी पुढील कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहे.

१. विविध वृत्तपत्रात जिल्हा परिषदेच्या विविध योजना/धोरणे/कार्यक्रम, प्रशासनाची कार्यपध्दती, यंत्रणा,अधिकारी/कर्मचारी यांच्याविषयी इ. बाबतची बातमी आल्यास त्या बातमीशी संबंधित विभागाच्या कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांनी त्यासंबंधीचा खुलासा बातमी प्रसिध्द झाल्याच्या दिवशीच दुपारपर्यंत संबंधित वृत्तपत्राकडे पाठवावा.

२. सदर खुलासा हा वस्तुनिष्ठ तसेच बातमीत नमूद नकारात्मक बाबीचे खंडण करणारा असावा. वरील प्रकारे कार्यवाही करण्यासाठी आपल्या विभाग प्रमुखाची मदत घ्यावी.

३. वरील प्रमाणे कार्यवाही करताना सदरहू बातमी मा.अध्यक्ष महोदय अथवा जिल्हा परिषदेच्या ध्येय धोरणा संबंधित असल्यास त्याबाबतच्या खुलासासाठीचा मसुदा मा.अध्यक्ष महोदय यांचकडे त्यांचे स्विय सहाय्यक यांचेमार्फत तात्काळ सादर करावा.

४. अन्य बातमीच्या प्रकरणी कार्यालय प्रमख यांनी वृत्तपत्राकडे सादर केलेल्या खुलाशाची प्रत मा. अध्यक्ष महोदय व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्विय सहाय्यक यांचेकडे दुपारी ३.०० वाजे पर्यंत पाठविण्यात यावी.

वरील कार्यपध्दतीचे विभाग व तालुकास्तरावर काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांची राहिल. सदर कार्यपध्दतीचे पालन केले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

विभाग व तालुकास्तरावरील खातेप्रमुखांनी आपले विभागाशी संबंधित बातमी असल्यास त्यासंबंधीचा खुलासा बातमी प्रसिध्द झाल्याच्या दिवशीच दुपारपर्यंत संबंधित वृत्तपत्राकडे जिल्हा माहिती अधिकारी, सातारा यांचेमार्फत पाठवावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच सदरच्या बातमीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नजीकच्या आठवडा सभेमध्ये माझेकडे समक्ष सादर करावा.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा, जिल्हा परिषद सातारा
मो.नं.-९४२२९९३३३३
Email-ceozpstr@gmailcom

**प्रति,**

१. सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमख ------------------------ जिल्हा परिषद सातारा.
२. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती-------------------

२/- आपले तालुका स्तरावरील सर्व कार्यालयांना सदर परिपत्रकाची प्रत निर्दशनास आणून त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत आपले स्तरावरुन सूचना द्याव्यात.

3. web site.